**नियमीत दिवाणी दावा क्र. २६९/२०२३**
**रुख्मनबाई वि. शेषराव**
**नि.क्र. २० खाली**

**वादीतर्फे सा.क्र.१ यांचा कागदपत्रांना निशाणी देण्याकरीता पुढील सरतपासा वादीतर्फे श्री.मुळे यांच्याद्वारे शपथेवर पुन्हा सुरु–**

३. आता मला नि.क्र. २६ च्या अर्जाखाली दाखल केलेले खरेदीखताची प्रमाणित प्रत दाखवली. ते खरेदीखत मी वादग्रस्त मिळकत बदलीबाई किसन चव्हाण यांच्याकडुन खरेदी केल्याबाबतचे आहे. त्यावर माझी, साक्षीदार म्हणुन सेवाकिसन आणि फुलसिंग होते. त्यावर विकणार म्हणुन बदलीबाई चव्हाण हिचा अंगठा आहे. त्या सर्व निशाणी अंगठे त्यांनी दुय्यम निबंधक कार्यालयात माझ्यासमक्ष केले होते. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या प्रमाणित प्रत असल्यामुळे त्यास **निशाणी क्रमांक २७** देण्यात आला. दि.०८/०७/२०१४ रोजी मी पोलीस स्टेशनला प्रतिवादींनी माझ्या ताब्यास हरकत अडथळा केल्याबाबत व मला मारहाण केल्याबाबत दिलेल्या तक्रारीची प्रत दाखवली. त्यावर ती तक्रार मिळाल्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनचा शिक्का व सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. ती स्थळ प्रत असल्यामुळे त्यास **निशाणी क्रमांक २८** देण्यात आला.

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे :–**

**त्यांच्याविरुध्द प्रकरण एकतर्फी चालले असल्यामुळे साक्षीदारास कोणताही उलटतपास नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र. ३ तर्फे विधीज्ञ श्री. पहेलवान यांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GANESH VASANTAPPA GANDHE
Date: 2026.03.12 17:22:15 +0530

**दिनांक** :१२.०३.२०२६ (जी.व्ही.गांधे)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पैठण.